अंक ४ : जून २०१२

# समजदार जोडीदार

सेंटर फॉर हेल्थ अँड सोशल जस्टिस पुणे - गाव पातळीवरील जनजागृतीसाठी व खाजगी वितरणासाठी प्रकाशित

**भागीदार संस्था** - सावित्रीबाई फुले महिला मंडळ, बीड
**फॅसिलिटेटर** - विजयानंद आखाडे
कैलास वीर

गाव आणि गावपातळीवरील कार्यकर्ते

| | प्रेरक | गावाचे नाव |
|---|---|---|
| १. | राहुल कोरडे | जरूड |
| २. | राजेंद्र आखाडे | पिंपळगाव मोची |
| ३. | जिजाभाऊ सोनवणे | म्हाळस जवळा |
| ४. | सुनिल वाघमारे | खांडे पारगाव |
| ५. | नितीन भडगळे | शिदोड |
| ६. | अशोक आनेराव | इमामपुर |
| ७. | गणेश कोकाटे | ब्रम्हगाव |
| ८. | सुरेश बोचकुरे | घोडका राजुरी |
| ९. | गणेश ओव्हाळ | काठोडा |
| १०. | परमेश्वर बनकर | शिवणी |
| ११. | नागेश शिंदे | ढेकणमोहा |
| १२. | बाळासाहेब ससाणे | काळेगाव |
| १३. | आनंद विद्यागर | जुजगव्हाण |
| १४. | सखाराम वायबट | गुंधावाडी |
| १५. | आलमगिर पठाण | कुक्कडगाव |
| १६. | मच्छिंद्र गव्हाणे | वडगाव गुंधा |
| १७. | चॉंद पठाण | आडगाव |
| १८. | मोहन वाघमारे | वायबटवाडी |
| १९. | राहुल वाघमारे | उमरद |
| २०. | नाना डोळस | वांगी |

## यशोगाथा

१. **ॲनिमेटर** - शंकर इतापे
**गाव** - आरणगाव
**संस्था** - युवा ग्राम, केज, बीड

**नमस्कार।** मी युवा ग्राम या संस्थेमध्ये समजदार जोडीदार या प्रकल्पात प्रेरक म्हणून काम करीत आहे. मला ३ मुली, एक मुलगा व पत्नी असा माझा परिवार आहे.

समजदार जोडीदार प्रकल्पात येण्यापुर्वी मला समाजातील मुलींची सुरक्षितता विषयी भिती वाटायची. कारण माझ्या मुली दिसायला सुंदर आहेत त्यामुळे माझ्या मनात त्यांच्या सुरक्षेविषयी भिती वाटायची. हया भितीमुळे मी एका मुलीचे शिक्षण अपुर्ण ठेवून तिचे लग्न करून टाकले.

समजदार जोडीदार प्रकल्पात आल्यावर मला वेळोवेळी वेगवेगळया विषयांवर प्रशिक्षण व माहिती मिळत गेली व त्यामुळे मी मुली व महिलांकडे त्यांच्या अधिकाराच्या दृष्टीकोनातून बघू लागलो. मी माझ्या मुलींचं शिक्षण पण बंद केलं होतं ते मी पुन्हा त्यांना शाळेत पाठवून सुरू केलं तसेच मुलींना संगणकाचे ज्ञान आवश्यक आहे म्हणून त्यांना संगणकाचा कोर्स ही लावून दिला हया प्रकल्पामुळे माझ्या पत्नीची पण मुलींच्या शिक्षणाविषयीची जुनी मानसिकता व विचार बदलले. मी व माझ्या पत्नीने आता असं ठरविलयं की, मुलींचे शिक्षण पूर्ण झाल्या शिवाय व त्या स्वावलंबी झाल्याशिवाय त्यांच्या लग्नाचा विचार करणार नाही.

मी आता माझ्या पत्नीला घरकामात मदत करत आहे. जसं - भाजी चिरणे, भाजी स्वतः बनवणे, चपात्या बनविणे, इ. स्वयंपाक झाल्यानंतर सगळे कुटुंब मिळून एकत्र जेवायला बसतो. पुर्वी मी माझ्या मुली व मुलगा हयांच्या आहारात भेदभाव करायचो, तो मी आता करीत नाही. मुलांप्रमाणे मुलींनाही माझ्या कुटुंबात आहार दिला जातो. हया प्रकल्पात

**स्त्रीयांच्या हक्कांचा आदर करणा-या पुरुषांचा आम्ही आदर करतो**

येण्या अगोदर मी माझ्या कुटुंबाकडे, मुलांकडे व इतर घरगुती कामाकडे लक्ष देत नव्हतो, पण आता मी माझ्या पत्नीला, मुलींना पुर्णपणे सहकार्य करतो. शेतात आणि घरात पण दोघं मिळून उत्सहाने जोमाने काम करतो.
आता मी इतर गोष्टींत पण पत्नीचा निर्णय विचारात घेत आहे.

२. **ॲनिमेटर** - भारत सोपान चटप
**गाव** - ढाकेफळ
**संस्था** - युवा ग्राम, केज, बीड

मी शेती करतो, तसेच माझी पत्नी व मी दोघेच कुटुंबात आहोत. लग्नाला १८ वर्षे झाली पण आजपर्यंत मुलबाळ नाही. यामुळे मी निराश व माझ्यामध्ये चिडचिडेपणा जास्त होता. घरात सुखी समाधानी पणा नव्हता. मनात अनेक समज - गैरसमज होते. जास्त रूबाबी थाटात जीवन जगायचो असेच एके दिवशी मी गावच्या उपसरपंचपदी निवडुन आलो हयामुळे तर माझी पुरूषी सत्ता घरात जास्तच वाढली. बायकोकडे दुर्लक्ष होऊ लागले माझा तीला कोणत्याच कामात आधार नसे अशी परिस्थिती होती. पण समजदार जोडीदार प्रकल्पात ॲनिमेटर म्हणून माझी निवड झाली आणि हयामुळे माझ्यात हळूहळू बदल होऊ लागले. प्रथम मी माझा स्वभावच बदलला चिडचिडेपणा कमी झाला. बायकोशी संवाद साधू लागलो. आरोग्यावर सविस्तर बोलू लागलो. खरं तर मुलं न होण्यावर बायकोला आज मी सविस्तर समजावून सांगतो. तसेच तीच्या आरोग्याकडे स्वतः लक्ष देत आहे व घरातील कामात देखील सहभाग वाढवला आहे. स्वयंपाकात भाजी चिरणे, चहा, भाजी बनविणे हे कामं आता करू लागलो आहे. हयामुळं मला खुप आनंदी वाटत आहे आज आरोग्या विषयी पत्नीसोबत सविस्तर बोलत आहे व महत्वाचे की ९ एकर जमिनीपैकी ४ एकर २० गुंठे जमिन पत्नीच्या नावावर केली आहे व तेवढीच माझ्या नावावर ठेवली आहे. एवढेच नाही तर माझ्या पत्नीमध्ये बोलण्यात खुलेपणा आला आहे. हा माझ्या व माझ्या कुटुंबात या प्रकल्पामुळे मोठया प्रमाणात बदल मला दिसतो.

३. **अक्षय लक्ष्मण बोरगे** - अविवाहित गट सदस्य, करंदी
**ॲनिमेटर** - विजय कव्हे,
**संस्था** - नारी समता मंच, पुणे

मी अक्षय लक्ष्मण बोरगे, करंदी, ता. भोर, जिल्हा पुणे या ठिकाणी राहणारा माझी पहिली ते सातवी पर्यंतची शाळा गावातच झाली आणि ८ वी ला मी गावापासून सहा कि.मी. लांब चेलाडी या ठिकाणच्या शाळेत गेलो. त्या वेळेस नारी समता मंच ही संस्था मला मिळाली गावात समजदार जोडीदार प्रकल्पाचे काम सुरू झाल्यावर मी अविवाहित युवक गटाचा सदस्य झालो प्रत्येक मुले - मुली यांच्या जवानीच्या काळात जे प्रश्न पडतात आणि त्या प्रश्नांची उत्तरे द्यायला कोणी नसते त्यावेळी ती स्वतः विचार करत बसतात. पण त्या काळात मला पडलेले प्रश्न हे मी ॲनिमेटर श्री. विजय कव्हे व फॅसिलिटेटर श्री. जगदिश कसबे यांना विचारायला लागलो. मला हया वयात सर्व महत्वाची माहिती म्हणजे पुरूष व स्त्रीयांच्या अंगांविषयी माहिती, निरोधचा वापर, इतर गर्भनिरोधकांची माहिती सरकारी दवाखान्यांतुन मिळणा-या सेवांची माहिती, उपचारांची माहिती वेळोवेळी मिळत असल्यामुळे मी फार आनंदी होतो. कारण ब-याच गैरसमजुती दुर होण्यास मदत झाली. तसेच मला आदर्श लैगिंक संबंध कसे असावेत हयाची पण महत्वाची माहिती मिळाली व महिलेशी किंवा पत्नीशी संबंध ठेवताना तीची संमती / परवानगी घेणं महत्वाचं हे पण समजलं. प्रकल्पात येण्यापुर्वी मी घरकाम करायचो पण तेही आवड म्हणून करीत नव्हतो, त्यावेळी हे काम मजबूरी म्हणूनच करावं लागायचं कारण मला बहीण नाही. उदा. पाणी भरणे, घर झाडणे, भांडी घासणे इ. पण आता मी ही कामे मजबुरी म्हणून नाही तर माझ्या आई - वडीलांचा त्रास कमी व्हावा म्हणून करतो. मी स्वतःची कपडे स्वतः धुवत आहे.

माझे आई - वडील शेती करतात. मी माझ्या शाळेचा शर्ट हा आईला घरी आल्यावर धुण्यास सांगायचो, ती एवढं कष्ट करून यायची तरी शर्ट धुवायची. मग माझ्याच मनाला लागायचं गट बैठकीतून महिलांवर असलेल्या कामाचा भार हया विषायावरील माहितीमुळे मी माझा शर्ट स्वतः धुवायला लागलो. मी आता सर्व घर झाडुन काढतो पाणी भरतो स्वतःची भांडी घासतो, स्वतःचे अंथरूण स्वतः काढतो.

तसेच मला आता मुलींविषयी काही वेगळं वाटत नाही. त्यांचे काम, कपडे बघितल्यावर असं वाटायचं की मुलींनी घरातच राहिलं पाहिजे पण आता मला तसं वाटत नाही कारण आता मला त्यांच्या अधिकारांविषयी जाणीव

**अरे संसार संसार, लग्नाची का घाई फार ? उमलू द्या जाई जुई, करा पोरीचा विचार**

झाली आहे. मुलींनी कोणती कपडे घालावी हे त्यांनी त्यांच्या आवडी नुसार ठरवावं असा मी विचार करू लागलो आहे. पुर्वी मला मुली घालत असलेल्या तोकडया कपडयांमुळे राग यायचा. हा सर्व बदल मी समजदार जोडीदार प्रकल्पाच्या माध्यमातुन होणा-या युवकांच्या बैठकीतून मिळालेल्या माहितीमुळे , प्रशिक्षणामुळे माझ्या विचारात व वागणूकीत बदल झाला आहे.

४. **ॲनिमेटर** - आनंद विद्यागर
**गाव** - जुजगव्हाण
**संस्था** - सावित्रीबाई फुले महिला मंडळ, बीड

मी आनंद विद्यागर, जुजगव्हाण येथील रहिवासी असून मी सध्या समजदार जोडीदार प्रकल्पामध्ये प्रेरक म्हणून काम करत आहे. प्रकल्पामध्ये काम सुरू करायच्या आगोदर मी घरामध्ये आईला व पत्नीला घर कामामध्ये कधीच मदत करत नव्हतो कारण मला घरगुती काम हे बायकांचं काम आहे असा विचार मी करायचो तसेच इतर पुरूषांप्रमाणेच माझ्यात पण तथाकथीत पुरूषीपणाची विचार पध्दती होती ती वेगवेगळया प्रशिक्षण व मिटींगमुळे मिळालेल्या माहितीमुळे कमी होण्यास मदत झाली. मला पहिली एक मुलगी आहे आणि तीन महिन्यांपुर्वी मला दुसरी ही मूलगीच झाली. माझ्या आई वडीलांना नातू पाहिजे होता. हयाचा माझ्यावर व पत्नीवर अप्रत्यक्ष दबाव होता. तरी पण मी लिंग निदान चाचणी केली नाही. माझ्या पत्नीच्या बाळंतपणावेळी मी तीच्या सोबत होतो मी तिला दवाखान्यात घेऊन आलो. थोडयाच वेळात डॉक्टरने मला मुलगी झाल्याचं सांगितलं मी पत्नीस भेटुन मुलापेक्षा मुलींना आई वडीलांची जास्त माया असते, मुली पण मुलांबरोबर सर्व क्षेत्रात जावू शकतात असं सांगितल्यावर माझी पत्नी पण खुश झाली घरी जाताना दोन किलो पेढे घेऊन घरी व शेजारी वाटले काही लोकांनी विचारलं की दुसरी मुलगी झाली तरी तु एवढा खुश का आहे? मी त्यावर म्हणलो की माझ्यासाठी मुलगा - मुलगी दोन्ही समान आहेत.

मी सध्या घरामध्ये मोठया मुलीला आंघोळ घालतो, तीला अंगणवाडीत नेऊन बसवतो, जर मुलीने शी केली तर मी स्वतः मुलीला स्वच्छ करतो, घरामध्ये पत्नीला व आईला घरकामात मदत करतो. हा सर्व माझ्या वागणुकीतला व विचारातला बदल समजदार जोडीदार हया प्रकल्पात काम करत असल्यामुळे झाला आहे.

५. **ॲनिमेटर** - धर्मराज लवटे
**गाव** - निजामपुर
**संस्था** - अस्तित्व ट्रस्ट, सांगोला

**नमस्कार।** माझं नाव धर्मराज लवटे असून मी निजामपूर या गावात राहतो. मला दोन मुली, एक मुलगा आहे. मी २०१० सालापासून समजदार जोडीदार हया प्रकल्पात प्रेरक म्हणून काम करीत आहे. मी ग्रामपंचायत सदस्य असून मी एस.वाय.बी.ए. पर्यंत शिक्षण पुर्ण केले आहे.

हया प्रकल्पात आल्यानंतर प्रशिक्षण, मासिक बैठकांच्या द्वारे महिलांवर होणारी हिंसा, जेंडर, स्त्री -पुरूष समानता म्हणजे काय व हयात पुरूषांची भागीदारी, महिलांचे आरोग्य व प्रजनन आरोग्य इ. विषयावर सखोल माहिती मिळाल्यामुळे माझ्या विचारात व वागणुकीत खूप बदल झाला आहे. मी आता माझ्या पत्नीला घरकामात मदत करत आहे. मुलांना शाळेसाठी तयार करणे, ड्रेस घालणे, शाळेत नेऊन सोडणे, बाजार करणे इ. काम आम्ही दोघंही करत आहोत. काही कामांची आम्ही विभागणी केली आहे. कारण हया प्रकल्पामुळे मला समजलयं की जेवढी कामे पुरूषांना असतात तेवढी किंवा त्यापेक्षा जास्त कामे बायकांना करावी लागतात. पुर्वी घरगुती कामे करताना कमीपणा वाटायचा पण आता वाटत नाही. माझ्यातील बदलामुळे केवळ माझ्यातच नाही तर माझ्या कुटुंबातही सुधारणा, चांगले वातावरण तयार झालं आहे. माझ्या व बायकोमधील विश्वासात वाढ झाली आहे. कामाच्या विभाजन व समान वाटपामुळे पत्नीच्या अंगावरील कामाचा भार कमी झाला आहे. आता आम्ही सर्वजण एकत्र जेवण करतो पुर्वी पुरुष आगोदर जेवायचे व नंतर बायका जेवायच्या.

आता मी, माझी आई व पत्नीसोबत आरोग्याच्या प्रश्नांवर मोकळेपणाने बोलतो. पुर्वी असं वातावरण नसल्याने कधीही बोलत नव्हतो. आईच्या गर्भाशयाच्या ऑपरेशन बद्दल तीच्यासोबत चर्चा करून ऑपरेशन केलं. प्रकल्पाच्या सुरूवातीला गट सदस्य बैठकीसाठी कमी येत कारण त्यांना स्त्री - पुरूष समानता, हिंसा वगैरे मुद्देच पटत नव्हते. पण आज दोन वर्षानंतर कमीत कमी १०-१२ गट सदस्य दर महिन्याच्या मासिक बैठकीसाठी उपस्थित राहुन

**अरे संसार संसार, एकमेकांचा विचार, आनंदाने भरे घर, होई सुखाचा संसार**

आरोग्य व इतर विषयांवर माहितीची मागणी तसेच चर्चा करीत आहेत.

माझ्या गावातील ३ मुलींना १० वी पास होऊन ही त्यांच्या घरचे पुढे महाविद्यालयात पाठवायला तयार नव्हते मी त्यांच्या पालकांना भेटून समजावून सांगितल्यामुळे त्या तीन मुलींना ११ वीत प्रवेश घेऊन त्या आता शिक्षण पुढे घेत आहेत.

६. **ॲनिमेटर** - शिवानंद सोनकांबळे
**गाव** - सांगबी बु.
**संस्था** - हॅलो मेडीकल फाऊंडेशन, अणदुर

**नमस्कार।** मी शिवानंद सोनकांबळे समजदार जोडीदार हया प्रकल्पात प्रेरक म्हणून काम करीत आहे. समजदार जोडीदार प्रकल्पाच्या माध्यमातुन वेळोवेळी मिळालेल्या प्रशिक्षण व इतर माहिती मुळे माझ्या विचारात व वागणुकीत मोठा बदल झाला आहे. प्रेरक म्हणून काम करण्यास सुरूवात करण्यापुर्वी माझा स्वभाव जास्त चिडचिडा होता. बारीक-सारीक गोष्टींवरून मला राग यायचा, माझ्या पत्नीला व आईला घरकामात कधीच मदत करत नव्हतो मुलीला आंघोळ घालणे, शाळेत घेऊन जाणे, आई व बायकोच्या आरोग्याची काळजी घेणे इत्यादी माझ्याकडून कधीच होत नव्हतं. कारण मला कधीच वाटत नव्हतं की पती, मुलगा व वडील ही सर्व माझी जबाबदारी आहे. परंतू वेळोवेळी प्रशिक्षणाद्वारे मिळालेल्या माहितीमुळे मला अंतर्मुख होऊन विचार करायला भाग पाडलं. प्रशिक्षणांमुळेच मला समजलं की महिलांवर कामाचा भार असतो व त्या भाराचा त्यांच्या आरोग्यावर पण परिणाम होतो. हया प्रकल्पामुळे स्त्री - पुरूष समानतेसाठी पुरूषांचा सहभाग महत्वाचा आहे हे पण मला समजलं असून मी घरगुती कामात आईला व पत्नीला मदत करत आहे. त्यांच्या आजारपणात मी त्यांना दवाखान्यात पण घेऊन जात आहे, हिंसामुक्त जिवन महिलांचा आधिकार आहे. हे पण मला पटलं आहे.

माझ्यात झालेल्या बदलामुळे माझी आई, पत्नी व घरातील इतर सदस्य पण खूश आहेत.

**राजश्री सोनकांबळे** (ॲनिमेटरची पत्नी) : हया प्रकल्पात येण्या आगोदर माझे पती सारखे चिडचिड करायचे, ओरडून बोलायचे ते घरात असताना माझ्या मनावर दबाव असायचा, भिती वाटायची, असं वाटायचं की ते घरात असूच नयेत. पण त्यांच्यात झालेल्या बदलांमुळे आता तसं वाटत नाही. माझे विचार ते समजून घेत आहेत, घरकामात मला मदत करत आहेत, मला वाटतं त्यांच्यातील हा बदल कायम टिकून रहावा.



गट कार्य करतांना प्रेरक



कौशल्यवृध्दी कार्यशाळा - प्रेरकांसाठी

कृपया अधिक माहितीसाठी खालील वेबसाईटला भेट द्या.
http://www.chsj.org / enhancing-male-participation-in-maharashtra.html

**भेदभाव संपवा : समानतेचे सूत्र धरा ....**